# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

<u>शिपाई पदाचे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांसाठी सूचना</u>

**शिपाई पदाचे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांनी दिनांक ०४/१२/२०२३ रोजीच्या जाहिरातीमधील अ.क्र.५ प्रमाणे खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested Copies) व त्याच्या मूळ प्रती सादर करणे आवश्यक आहे.**

१. जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला/माध्यमिक शाळा प्रमाणपत्र)

२. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३. अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.

४. दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्र, त्यांचे नाव, पदनाम आणि पूर्णटपाल पत्त्यासह, जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवारांचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे या जाहिराती बरोबर दिलेल्या विहीत नमुन्यात दिलेले.

५. शासनाने विहीत केलेल्या प्राधिका—याकडुन निर्गमित केलेला जातीचा दाखला.

६. उमेदवार अगोदरपासून राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधीत विभागाकडुन ना हरकत प्रमाणपत्र.

७. अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे, असल्यास.

८. विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र /सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

९. उमेदवारास २८.०३.२००६ नंतर जन्मलेल्या हयात मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त आहेत का? याबाबतचे प्रमाणपत्र (टीप : दुस—या प्रसुतीदरम्यान जन्मलेल्या जुळया मुलांना एकच मुल मानले जाईल.)

१०. उमेदवाराने, शासनाने निर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासवर्गासाठी विचार करण्याचा पर्याय स्वीकारला असल्यास त्याने/तिने संबंधीत प्रवर्गात विचार करण्यास हक्कदार होण्यासाठी प्रमाणपत्र सादर करावे व तसे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांना चुकीची माहिती सादर केल्याबद्दल अपात्र ठरविले जाईल आणि तसेच सर्वसाधारण प्रवर्गात त्याचा विचार केला जाणार नाही.

११. परीक्षा प्रवेशपत्र व इतर कोणतेही कागदपत्रे मागीतल्यास सादर करावी.

१२. उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्रे व सदर कागदपत्रांचा संच वरिल दर्शविलेल्या क्रमाप्रमाणे लाऊन सादर करावा.

१३. मुलाखतीस हजर राहतांना उमेदवारांनी आपले मूळ प्रवेशपत्र, ओळख पटविणारे कागदपत्र जसे की, पॅनकार्ड/वाहनचालक परवाना(स्मार्ट कर्ड प्रकारचे)/मतदार ओळखपत्र/पासपोर्ट/बॅक पासबुक(फोटो आणि शिक्का असलेले) सोबत आणणे आवश्यक आहे.

१४. सदर सुचना ही अंतिम सुचना असुन "मुलाखती" (Interview) साठी वेगळे बोलावणी पत्र पाठविण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर**

**दिनांक : १२/०८/२०२४**

12-8-24

**(व्ही. व्ही. पाटील)**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
तथा अध्यक्ष सल्लागार समिती,
<u>लातूर</u>